**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
**तालुका - राहाता , जिल्हा - अहमदनगर**
**दुरध्वनी क्र. - (०२४२३) २५८५००, २५८९२२**

## निवीदा सुचना

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत नारळ फळे (शहाळे) वार्षिक विक्री करणेसाठी सिलबंद दरपत्रके खालील नमुद केलेल्या अटी/शर्तीस अधीन राहुन मागविणेत येत आहे.

**अटी/शर्ती**

१. संस्थान परिसरातील (साधारणतः१२०० नारळ झाडे) नारळ फळे (शहाळे) काढण्याचा कालावधी ०१ वर्षाचा असेल.
२. नारळ फळे (शहाळे) झाडावरुन काढणे, वाहतुक करणे आदी कामे इच्छुक ठेकेदारांनी स्वखर्चाने करावयाची आहे.
३. सदर कालावधील संस्थान परिसरातील नारळ झाडांची देखभाल करणे , पाणी देणे, खते व औषधे देणे याची संपूर्ण जबाबदारी खोती घेणारावर राहील. झाडांचे नुकसान झाल्यास भरपाई करुन दयावी लागेल.
४. झाडांवरुन नारळ फळे(शहाळे) काढते वेळी अपघात झाल्यास ती जबाबदारी खोती घेणारावर राहील.
५. नारळ फळे (शहाळे) विक्री करणेकामी आपले सिलबंद दरपत्रक **दि. ३०/०९/२०२०** अखेर सायं. ०५.०० वा. पर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी, **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी ता. राहाता, जि. अहमदनगर** या पत्त्यावर पाठविणेचे करावे.
६. दरपत्रक सिलबंद करुन त्यावर **"शहाळे फळे कोटेशन"** असा स्पष्ट उल्लेख करावा.
७. सिलबंद दरपत्रक बंद पाकिटात सादर करावयाची असून त्यासोबत रु. १०,०००/- मात्रचा राष्ट्रीयीकृत बॅंकेचा डिमांड ड्राफ्ट जोडणे आवश्यक आहे. बयाणा रक्कम न भरलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
८. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे कुठलीही एक अथवा सर्व निवीदा कुठल्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेबाबतचा हक्क राखून ठेवत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी